अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक
महाराष्ट्र राज्य, जुनी प्रशासकीय इमारत, २ रा मजला
पुणे-४११ ००१
दुरध्वनी ०२०-२६१२ ४८१५/ फॅक्स ०२०-२६१२ ५८७८
adgprison.pune@home.maharashtra.gov.in

**परिपत्रक**

जा.क्र.शेती/ ८४४५ / २०१३-१४/ कक्ष-७ (शेती) दि. २७/०९/२०१३

मुख्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, कारागृहाचे प्रक्षेत्रावरील शेतीचे संरक्षण करणेसाठी तटभिंतीचे प्रस्ताव तयार करुन सादर केले जातात. तथापि शासन स्तरावरुन सदर कामास मंजुरी मिळत नाही किंवा मंजुरी मिळाल्यास अनुदान उपलब्ध होऊ शकत नाही.

१. सबब शेतीचे संरक्षणासाठी गुरे प्रतिबंधक चर किंवा तार कुंपन करणेबाबत संबंधीत अधीक्षकांनी याबाबत निर्णय घेऊन कार्यवाही करावी. गुरे प्रतिबंधक चर काढणेबाबतची तांत्रिक माहिती सोबत जोडली आहे.

गुरे प्रतिबंधक चर किंवा तार कुंपन कामकाजाबाबत संबंधीत अधीक्षक व कारागृह उपमहानिरीक्षक यांनी त्यांचे अनुदान अधिकार मर्यादेत टप्प्या-टप्प्याने पुर्ण करावे जेणेकरुन शेती तटभिंतीचा कायमस्वरुपी प्रश्न सुटु शकेल.

२. कारागृहाकडील अतिरिक्त जनावरांच्या हस्तांतराबाबत किंवा काही कारागृहास पशुधन आवश्यक असल्यास याबाबतही संबंधीत अधीक्षक व कारागृह उपमहानिरीक्षक यांचे समन्वयाने योग्य तो निर्णय घ्यावा.

३. कारागृह शेती प्रक्षेत्रात रोपवाटीका तयार करावी. ज्यामध्ये स्थानिक मागणीचा विचार करुन औषधी/सुगंधी वनस्पती, फुलांची/शोभेची रोपे उत्पादन व विक्री करुन कारागृहाचे उत्पन्न वाढवावे.

४. कारागृहाकडील अनावश्यक किंवा विना वापर साधन/यंत्रसामुग्री किंवा इले. मोटर यांची विल्हेवाट लावणे तसेच पर्यायी साधनाची खरेदी करणे याबाबतचा प्राधान्यक्रम निश्चित करुन लेखा पध्दतीचा अवलंब करुन कार्यवाही करावी. कारागृहाच्या उत्पन्न वाढीसाठी व्यवहार्य बाबींचा अवलंब करणेबाबत संबंधीत अधीक्षक व कारागृह उपमहानिरीक्षक यांचे समन्वयाने योग्य तो निर्णय घेऊन याबाबत मुख्यालयास अवगत करावे. कोणत्याही परिस्थितीत शेती उत्पन्न वाढीविषयक कामकाज विना निर्णय खोळंबुन राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

26.9.13.

**(मीरां चड्डा बोरवणकर)**
**अपर पोलीस महासंचालक व**
**कारागृह महानिरीक्षक**
**महाराष्ट्र राज्य पुणे-१**

**प्रति,**

**अधीक्षक,म.का.**येरवडा/कोल्हापूर/औरंगाबाद/नाशिकरोड/नागपूर/अमरावती/ठाणे **जि.का.** सांगली/सातारा/ विसापूर/ धुळे / परभणी/उस्मानाबाद/ बीड/नांदेड/ अकोला/भंडारा/ चंद्रपूर/ यवतमाळ/बुलढाणा/वर्धा,**खुलेजि.का.** येरवडा/पैठण/ मोर्शी खु.जि.का / खुली वसाहत आटपाडी/वि.का.रत्नागिरी


**प्रत- कारागृह उपमहानिरीक्षक**, पूर्व विभाग, नागपूर//पश्चिम विभाग, पुणे/मध्य विभाग औरंगाबाद/दक्षिण विभाग, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषीत

## गुरे प्रतिबंधक चराबाबत तांत्रिक मार्गदर्शन

कारागृहातील शेतीचे संरक्षण करणेसाठी **'गुरे प्रतिबंधक चर'** (Trench cum Mond) तयार करणे आवश्यक आहे. शेतीचे मोकाट गुरांपासून संरक्षण करणेसाठी शेती सीमेलगत १.९ मी. रुंद, १ मी. खोल व तळाची रुंदी ०.६ मी. आकाराचा चर खोदला जातो. तथापि या चरामुळे जमीनीची धुप होणार नाही याची दक्षता घ्यावी. आवश्यकतेनुसार चराला आतुन दगडी पिचिंग करावे. चर खोदलेल्या मातीचा १.२ मी. रुंद, ०.५ मी. उंच व बांधाची माथा रुंदी ०.४ मी. करुन त्यावर जैविक कुंपन लागवड करावी. जैविक कुंपनासाठी भरावावरील माथ्यावर तीन ओळीत (Staggered) एकआड एक पध्दतीने मे महिन्यात चिल्हार, सागरगोटा, शिकेकाई किंवा स्थानिक पातळीवर उपलब्ध काटेरी झुडपांची रोपे/बी पेरावे. तसेच आवश्यकतेनुसार घायपात लागवड करावी. सदर लागवडीची जोपासना करावी. मर रोपांची वेळोवेळी नांग्या भरणी करावी. आवश्यकतेनुसार याबाबत स्थानिक वन विभागाचे मार्गदर्शन घ्यावे.

चर खुदाईचे काम आवश्यकतेनुसार स्थानिक पातळीवर भाडे तत्वावरील मशिनरीव्दारे करावे. सदरचे काम संबंधीत अधीक्षक व कारागृह उपमहानिरीक्षक यांनी त्यांचे अधिकारातील अनुदानाचे मर्यादेत पुर्ण करावे जेणेकरुन शेती तटभिंतीचा कायमस्वरुपी प्रश्न सुटु शकेल.

### गुरे प्रतिबंधक चर



अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक
महाराष्ट्र राज्य, जुनी प्रशा. इमारत, २ रा मजला, पुणे-०१
दुरध्वनी ०२०-२६१२ ४८१५/ फॅक्स ०२०-२६१२ ५८७८
adgprison.pune@home.maharashtra.gov.in

2797 **परिपत्रक**

जा.क्र. शेती/शेतमाल विक्री /२०१४ कक्ष-७ (शेती) पुणे-१ दिनांक१८ /०३/२०१५

कारागृह प्रक्षेत्रावर उत्पादित माल गरजेनुसार वापर करुन शिल्लक माल नजीकच्या कारागृहास पुरवठा करावा. तरीही माल शिल्लक राहत असल्यास स्थानिक/नजीकचे बाजारपेठेत विक्री करणेबाबत मुख्यालयाचे परिपत्रक क्र. ५६६४, दि. १०/७/२०१३ अन्वये कळविण्यात आले. तथापि यानुसार कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास येत आहे. सबब याबाबत खालीलप्रमाणे पुन:श्च निर्देश देण्यात येत आहेत.

१. उत्पादित शेतमालाचा गरजेनुसार वापर करुन शिल्लक माल नजीकचे कारागृहास पाठवावा. **ज्या कारागृहास माल पाठविला जाईल त्या कारागृहाने अग्रक्रमाने माल स्वीकारणे बंधनकारक आहे.** आवश्यकतेनुसार सदरची कार्यवाही विभागीय कारागृह उपमहानिरीक्षक यांचे समन्वयाने करावी.

२. वरीलप्रमाणे कार्यवाही करुनही माल शिल्लक राहत असल्यास स्थानिक/नजीकचे बाजार समितीमार्फत विक्री करावी. मात्र कोणत्याही परिस्थितीत माल वाया जाणार नाही याची दक्षता घ्यावी. बाजार समितीमार्फत मिळणारा दर मुख्यालयाने ठरविलेल्या दरापेक्षा कमी जास्त असला तरी विक्री करण्यास हरकत नाही. यामुळे नाशवंत मालाची वेळेत विल्हेवाट लागुन कारागृह उत्पन्नात वाढ होणार आहे.

३. बाजार समितीत माल विक्रीस पाठविण्यापूर्वी तेथील विक्री कार्यपध्दतीची माहिती करुन घ्यावी ज्यामुळे कोणत्याही संभाव्य अडचणी उद्‌भवणार नाहीत.

४. कारागृह अधीक्षकांनी व्यक्तीशः वरीलप्रमाणे सर्व बाबी नियंत्रित कराव्यात.

18.3.15

**(मीरां चड्डा बोरवणकर)**
अपर पोलीस महासंचालक व
कारागृह महानिरीक्षक
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रति,

अधीक्षक,
मध्यवर्ती/जिल्हा/खुले कारागृह (सर्व)

प्रत :- १. विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह), दक्षिण विभाग, मुंबई
२. कारागृह उपमहानिरीक्षक (सर्व)